**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ३०.०९.२०२५ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, ड्रंकन ड्राईव्ह कायद्या अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २९.०९.२०२५ रोजी नागपूर शहर पोलीसांनी, सर्व पोलीस ठाणे हद्दीत **महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ०२ केसेस, तसेच एन.डी.पी.एस कायद्यान्वये ०३ केसेस असे एकुण ०५ केसेसमध्ये ०६ ईसमावर कारवाई करून रू. ८,०९,३७०/— चा** मुद्देमाल जप्त केला. **महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये ११ ईसमावर कारवाई करून रू. १४,४६५/— चा** मुद्देमाल जप्त केला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकुण ८८९ वाहन चालकांवर कारवाई करून एकूण रू. २,१२,२००/— रू. तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) कुख्यात गुंड स्थानबध्द् :—**

नागपुर शहराचे पोलीस आयुक्त यांनी दिनांक २९.०९.२०२५ रोजी जारी केलेल्या आदेशान्वये पोलीस ठाणे पाचपावली व पारडी हद्दीत शरीराविरूध्द व मालमत्तेविरूध्द गुन्हे करणारा कुख्यात गुंड नामे आदित्य उर्फ दिल्ली वल्द विकास बब्बर, वय २१ वर्ष, रा. बारसेनगर, पोलीस ठाणे पाचपावली, नागपूर शहर यास महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, व्हीडीयो पायरेटस्, वाळु तस्कर, अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणारे, बेकायदेशिर जुगार, बेकायदेशिर लॉटरी चालविण्याचा आणि मानवी अपव्यापार करणाऱ्या व्यक्ती यांच्याविघातक कृत्यांना आळा घालणे संबंधी अधिनियम, १९८१ अंतर्गत दिनांक २९.०९.२०२५ रोजी स्थानबध्द आदेश पारीत केला. त्यास दिनांक २९.०९.२०२५ रोजी स्थानबध्द आदेशाची बजावणी करून नागपूर मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले आहे.

आदित्य उर्फ दिल्ली वल्द विकास बब्बर याचे विरूध्द पोलीस ठाणे पाचपावली व पारडी येथे प्राणघातक शस्त्राने आपखुशीने गंभीर दुखापत करणे, प्राणघातक शस्त्राने आपखुशीने दुखापत करणे, अपहरण करणे, स्त्रिचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तिच्यावर हमला किंवा फौजदारी बलप्रयोग करणे, अश्लिल भाषेत शिवीगाळी करणे, चोरी करणे, दिवसाची व रात्रीची घरफोडी करणे, चोरीचा माल लपवुन ठेवण्याकरिता साळय करणे, प्राणघातक शस्त्र जवळ बाळगणे, मनाई आदेशाचे उल्लंघन करणे, इत्यादी मालमत्तेविरूध्दचे तसेच शरीराविरूध्दचे गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत.

सदर स्थानबध्द इसमास गुन्हे करण्यापासुन परावृत्त करण्यासाठी आणि चांगल्या वर्तवणुकीसाठी पोलीस ठाणे पाचपावली अंतर्गत सन २०२३ मध्ये कलम ११०(ई)(ग) सीआरपीसी अन्वये प्रतिबंध कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर सन २०२४ मध्ये कलम ११०(ई)(ग) सीआरपीसी अन्वये प्रतिबंध कारवाई करण्यात आली होती. त्याचेकडुन

एक वर्षाकरिता अंतिम बंधपत्र घेण्यात आले होते. सदर बंधपत्राचे उल्लंघन करून त्याने इलीकडील काळात त्याने पोलीस ठाणे पाचपावली, नागपूर शहर हद्दीत प्राणघातक शस्त्राने आपखुशीने गंभीर दुखापत करणे, अश्लिल शिवीगाळ करणे, प्राणघातक शस्त्र जवळ बाळगणे, मनाई आदेशाचे उल्लंघन करणे, इत्यादी स्वरूपाचे गंभीर गुन्हे केलेले आहेत.

अशाप्रकारे धोकादायक व्यक्ती नामे आदित्य उर्फ दिल्ली वल्द विकास बब्बर याची अपराधीक कृत्ये निरंतर वाढत असल्याने आणि त्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण होत असल्याने वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पोलीस ठाणे पाचपावली नागपूर शहर यांनी नमुद आरोपीतास स्थानबध्द करण्याकरिता गुन्हे शाखेस प्रस्ताव सादर केला होता. गुन्हेशाखेतील एम.पी.डी.ए. विभागाने नमुद आरोपीला स्थानबध्द करण्याकरीता प्रस्ताव सादर केला. त्याअन्वये स्थानबध्द प्राधिकारी मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे समक्ष सादर केले असता त्यांनी वर नमुद स्थानबध्द इसमाविरूध्द स्थानबध्दतेचा आदेश पारित करून त्यास नशिक मध्यवर्ती कारागृह, नाशिक येथे ठेवण्याबाबत आदेश दिलेत. त्याअन्वये वर नमुद इसमाविरूध्द स्थानबध्दतेची महत्वपुर्ण कारवाई करून त्यास सध्या नागपूर मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले आहे.

**<u>३) गुन्हेशाखा युनिट क्र. ०१ पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक २८.०९.२०२५ चे १६.१५ वा. ते १७.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी रामकुमार शिवमुर्ती पांडे वय ३९ वर्ष रा. प्लॉट नं. १०, द्वारकापूरी, रामेश्वरी रिंग रोड, नागपूर यांनी त्यांची पॅशन प्रो गाडी क्र. एम.एच. ४९ के ६१८१ किंमती ३०,०००/—रू. ची ही पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत धिरन कन्या शाळेसमोर लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हेशाखा युनिट क्र. ०१ चे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना एका पॅशन प्रो दुचाकी गाडीवर एक ईसम संशयितरित्या हालचाल करीत असता दिसुन आल्याने त्यास थांबवून त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्यांचे नाव ख्वाजा रशीद शेख वय २३ वर्ष रा. वार्ड नं. ४, वडार वस्ती, बुट्टीबोरी, नागपूर असे सांगीतले. त्यास गाडीचे कागदपत्रे मागीतले असता, त्याने समाधानकारक उत्तरे न दिल्याने, दुचाकी बाबत खात्री केली असता, नमुद वाहन चोरीचे असल्याचे समजले. आरोपीस अधिक सखोल विचारपूस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरी केल्याची कबुली दिली. त्याचे ताब्यातुन पॅशन प्रो गाडी क्र. एम.एच. ४९ के ६१८१ किंमती अंदाजे ३०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी सिताबर्डी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि. सचिन भोंडे, पोअ. प्रितम यादव, स्वप्नील खोडके, योगेश वासनीक, अजमत शेख व सुशांत सोळंके यांनी केली.

## (गुन्हे)

**<u>१) पोलीस ठाणे हिंगणा :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ३०.०९.२०२५ चे ०१.३० वा. चे सुमारास, हिंगणा पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांनी नियंत्रण कक्ष येथुन मिळालेल्या माहितीवरून पोलीस ठाणे हद्दीत ग्रिन वेलवेट लॉन जवळ, हिंगणा ते गुमगाव रोड, हिंगणा, नागपूर येथे टाटा ट्रक क्र. एम.एच ४० एन ७५१७ ला थांबवून त्याची पंचासमक्ष पाहणी केली असता, त्यामध्ये २१ जिवंत गोवंशीय जनावरांना अवैधरित्या, निर्दयतेने चारा—पाणी न देता, कत्तलीकरीता बांधुन वाहतुक करतांना दिसुन आले. वाहन चालकास त्याचे नाव विचारले असता, त्याने आपले नाव नईम अब्दुल रहीम कुरैशी वय ३८ वर्ष रा. अल कुरैश मस्जिद जवळ, गड्डीगोदाम, सदर, नागपूर असे सांगीतले. नमुद जनावरे बाबत कागदपत्रे मागीतली असता, कोणीतीही कागदपत्रे न देता उडवा—उडवीचे उत्तरे दिली. आरोपी हे नमुद जनावरे

यांना कत्तलीकरीता निर्दयतेने वाहतुक करीत असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन २१ जनावरे व टाटा ट्रक वाहन असा एकुण किंमती अंदाजे २७,४४,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नमुद जनावरे यांना गोरक्षण येथे दाखल करण्यात आले आहे.

याप्रकरणी फिर्यादी पोअं. संजीव तायडे पोलीस ठाणे हिंगणा यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे पोउपनि. नागलोत ७५०७०७५६३६ यांनी आरोपीविरूध्द कलम ५(९) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनीयम १९७६, सहकलम ११(१)(डी), ११(१)(सि), ११(१)(एफ) प्राणी क्रुरता अधिनियम—१९६० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे पाचपावली :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २९.०९.२०२५ चे १७.४० वा. ते १८.३० वा. चे सुमारास, पाचपावली पोलीसांचे तपास पथक हे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान जवळ, कलकत्ता रेल्वे लाईनवर, सार्वजनीक ठिकाणी एक ईसम हातात शस्त्र घेवुन धुमधाम करतांना समक्ष दिसुन आला. त्यास ताब्यात घेवुन त्याचे हातातील एक जुने धारदार व टोकदार लोखंडी पाते किंमती अंदाजे ४००/—रू. चे जप्त करण्यात आले. आरोपीस त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव पवन किशोर ठाकुर वय २६ वर्ष रा. अशोक चौक, गोंड मोहल्ला, पाचपावली, नागपूर असे सांगीतले. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने लोखंडी धारदार शस्त्र बाळगुन मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी सुरेन्द्र तायडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे सपोनि. सोनवने ८१०८०७५०६० आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे कोराडी :—** दिनांक २९.०९.२०२५ चे १७.०० वा. चे पुर्वी, पोलीस ठाणे कोराडी हद्दीत, इंदीरा प्रगती नगर, वार्ड नं. १०, महादुला, कोराडी येथे राहणारे फिर्यादी यांचा मुलगा नामे प्रीन्सकुमार राजेश टेंभुर्णे, वय २८ वर्षे, हा सिध्दार्थ नगर सोनवणे यांचे घराजवळ ईलेक्ट्रीकचे पोलवर चढुन लाईन दुरूस्तीचे काम करीत असता, त्याला ईलेक्ट्रीक करंट लागल्याने तो खाली पडुन बेशुध्द झाला. त्याला लोकांनी उपचाराकरीता ॲलेक्सीस हॉस्पीटल येथे लेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी राजेश देविदास टेंभुर्णे, वय ५४ वर्षे, यांनी दिलेल्या सुचनेवरून, पोलीस ठाणे कोराडी येथे मपोउपनि. निशा गवळी ९८३४३२७९२५ यांनी अकस्मात मृत्यु ची नोंद घेतली आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे नंदनवन :—** अब्दुल रहीम दानीश शेख चॉद, वय २२ वर्षे, रा. प्लॉट नं ३५, आदर्श नुरूल ताज मस्जिद जवळ, उमरेड रोड, नागपूर हा दिनांक २४.०९.२०२५ रोजी पासुन पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतुन राहते घरी कोणाला काहीही न सांगता निघुन गेला. परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **वर्णन**— रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— मजबुत, केस— काळे, अंगात— गळद निळया रंगाचा फुल बाहिचा शर्ट व निळया रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतो.

**२) पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. :—** कु. पोर्णिमा पुंडलीक मुरूकुटे, वय १३ वर्षे, रा. एम.आय.डी.सी., नागपूर ही दिनांक २६.०९.२०२५ रोजी पासुन पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. हद्दीतुन राहते घरी शाळेत जाते असे सांगुन निघुन गेली. परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन**— रंग— सावळा, चेहरा— लांब, बांधा— सडपातळ, केस— काळे, उंची— ४ फुट, अंगात— पांढऱ्या निळया रंगाचा शाळेचा ड्रेस घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते.

**<u>३) पोलीस ठाणे मानकापूर</u> :—** सौ. सरीता अरविंद डाहाके, वय ३० वर्षे, रा. काळे सोसायटी, वानखेडे यांचे घरी बांधकामाचे ठिकाणी, मानकापूर, नागपूर हया दिनांक २६.०९.२०२५ रोजी ०६.०० वा. पासुन पोलीस ठाणे मानकापूर हद्दीतुन राहते घरी कोणाला काहीही न सांगता निघुन गेल्या. परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>**— रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— मध्यम, उंची— ५ फुट, केस— काळे, अंगात— काळया रंगाची साडी व ब्लाउज घातलेली आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात.


अब्दुल


पोर्णिमा


सरीता

**स्वा/—**
**(अंकुश उ. राठोड)**
**पोलीस उप—निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**